साप्ताहिक चतुरस्त्र | परखड | रास्त | कर्तव्यदक्ष

# चपराक

• वर्ष : १८
• अंक : ६
• पाने : ८
पुणे

मूल्य ६/-

www.chaprak.com
भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२


■ सोमवार, दि. २३ ते २९ मार्च २०२६ | संपादक : घनश्याम पाटील | कार्यकारी संपादक : प्रमोद येवले | RNI No. MAHMAR/2011/35979



'Industrial Efficiency Award' Winner

■ Pioneer in continuous vacuum pans
■ Manufacturer & supplier of turn-key boiling house
■ Refined sugar plants

For More Details Contact
INDIANA SUCRO-TECH (PUNE) PVT. LTD.



Madhav Chambers-1, Flat No. 7-8, Above Dena Bank, SB Road, Pune-411016.
WORKS : G-52. MIDC Ahilyanagar, 414111. Laxmi Industrial estate, Hatkangale, 416109.
Tel.: 020-25660872 Fax: 020-25662593
Email : istppl1@gmail.com/ www.istppl.in


# सातारच्या संमेलनाचं फलित म्हणजे परदेशातल्या पाऊलखुणा

## ■ विनोद कुलकर्णी यांचे प्रतिपादन : अनिल दातीर यांच्या पुस्तकाचे समारंभपूर्वक प्रकाशन ■



**सातारा, (प्रतिनिधी)** : ''अनिल दातीर हे वृत्तपत्रातून, समाजमाध्यमातून लिहित असतात. आम्ही पुस्तकप्रेमी समूहातही त्यांचं बरंच लेखन मी वाचलं आहे. साताऱ्यातील खंडित झालेली वाचनसंस्कृती वाढविण्यासाठी आम्ही काम करत होतो. त्यातून ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन साताऱ्यात आयोजित केले. त्या साहित्य संमेलनाचं फलित म्हणजे 'परदेशातील पाऊलखुणा' हे पुस्तक आहे. या संमेलनाच्या निमित्ताने या पुस्तकाची मुहूर्तमेढ रोवली गेली आणि अवघ्या दोन महिन्यात 'चपराक प्रकाशन'ने हे सर्वांगसुंदर पुस्तक वाचकांच्या हातात दिले,'' असे गौरवाद्गार साताऱ्याच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष आणि ज्येष्ठ पत्रकार विनोद कुलकर्णी यांनी काढले.

अनिल दातीर यांच्या 'परदेशातल्या पाऊलखुणा' या पुस्तकाचे प्रकाशन साताऱ्यात झाले त्यावेळी ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे, शिक्षणतज्ज्ञ संदीप वाकचौरे, शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य आणि नगर वाचनालय साताराचे अध्यक्ष अमित कुलकर्णी, डॉ. संदीप श्रोत्री, शिरीष चिटणीस, प्रकाशक घनश्याम पाटील, संतोष जगताप, सचिन देशमुख, राजेंद्र चोरगे आदी उपस्थित होते.

विनोद कुलकर्णी म्हणाले, ''या पुस्तकाची भाषा अत्यंत साधी, सरळ, प्रभावी आणि उत्कंठावर्धक आहे. पुस्तकाची मागची बाजू म्हणजेच पाठराखण जरी आपण वाचली तरी संपूर्ण पुस्तक वाचण्याचा मोह आपल्याला होतो. कोणत्याही सामान्य माणसाला सहज समजेल, अशी दातीर यांची भाषा आहे. सोपं लिहिणं हेच जास्त अवघड काम असतं. ते दातीर यांनी सहजपणे केलं असल्यानं महाराष्ट्रभर ते त्यांच्या लेखणीचा ठसा उमटवतील. त्यांचं देशांतर्गत प्रवास वर्णनाचं लेखनही मी वाचलं आहे. आपण त्या-त्या ठिकाणांना कधी भेट दिली नसली तरी तिथे जाऊन आल्याचा भास निर्माण व्हावं असं दातीर यांचं लेखन आहे.''

संदीप वाकचौरे म्हणाले, ''गावं सोडलेली माणसं पुन्हा गावात जात नाहीत, अशी सध्या अवस्था आहे. त्यांना गावाच्या, देशाच्या प्रेमात पडावं असं वाटत नाही. आपल्याकडचा जो बुद्धिमान वर्ग विदेशात राहतो तो सहसा पुन्हा भारतात परतत नाही. शिक्षणासाठी विदेशात गेलेली मुलेही तिकडंच राहायचा विचार करतात. असे असताना अर्धे जग पाहणारे अनिल दातीर यांना भारताची मातीच सदैव प्रिय वाटते. परदेशाचे अनुभव प्रभावीपणे मांडतानाच त्यांचं देशप्रेम सर्वोच्च ठरतं. आदिवासी भाग असलेल्या अकोले तालुक्यातील गणोरेसारख्या छोट्या गावातील एक तरुण साताऱ्यात येतो, स्वतः ला सिद्ध करतो, सातारकर त्याला स्वीकारतात आणि अकोले तालुक्यातील परदेशाचे वर्णन करणारे ते पहिले लेखक ठरतात, हे गौरवास्पद आहे. साहित्य समाज घडविण्याचं काम करतं. या पुस्तकानं जगाचं चित्र डोळ्यासमोर उभं करतानाच आपल्या देशाकडे पाहण्याचा दृष्टिकोन विकसित होतो.''

अमित कुलकर्णी म्हणाले, ''हौस म्हणून केलेलं हे पर्यटन असलं तरी दातीर यांनी त्यांच्या लेखणीतून ते उंचीवर नेले आहे. आपल्या परिसराचा, राज्याचा, देशाचा, जगाचा शोध घ्यायचा असतो तेव्हा लिखित साहित्याला प्राधान्य दिले जाते. त्याला शास्त्रीय आधार असतो. आपल्याकडे प्रवासवर्णनाची मोठी परंपरा आहे. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्यापासून ते मिलिंद गुणाजीपर्यंत अनेकांनी प्रवासवर्णनात्मक लेखन केले आहे. अनिल दातीर हेही आता त्या रांगेत जाऊन बसले आहेत. अनिल दातीर हे मुळातच संवेदनशील असल्याने त्यांनी ज्या पद्धतीने जग टिपलंय ते वाचणं महत्त्वाचं आहे. जग बघितल्याने आपल्या देशाकडे बघण्याचा दृष्टिकोनही विकसित होतो.''

''जगाच्या कानाकोपऱ्यात आपण भारताशी निगडित प्रत्येक गोष्टी शोधत असतो. अनिल दातीर यांच्या लेखनातही ते दिसून येते. लेखकांना प्रकाशात आणण्याचे काम प्रकाशक करतात. जेव्हा 'चपराक'सारखी प्रकाशनसंस्था पुस्तक प्रकाशित करते तेव्हा ते सर्वत्र पोहोचायला मदत होते. माझेही पहिले पुस्तक चपराकने प्रकाशित केले. साताऱ्यात साहित्यिक वातावरण चांगले आहे. इथल्या ग्रंथप्रेमी लोकांमुळे अनेक जण सातत्याने लिहित असतात. फेसबुकसारख्या समाज माध्यमातून लिहित असताना अनिल दातीर यांचे पहिले पुस्तक चपराकने प्रकाशित केले आहे. ते पुढेही लिहित राहतील आणि त्यांच्या लेखनाला वाचकप्रियता लाभेल,'' अशा शुभेच्छा शिरीष चिटणीस यांनी दिल्या.

प्रस्तावनाकार डॉ. संदीप श्रोत्री म्हणाले, ''कोणत्याही पुस्तकाला उत्तम प्रकाशक लाभणं हे महत्त्वाचं असतं. मुलगी लग्नाला आल्यानंतर तिला छान सजवावं लागतं. 'चपराक प्रकाशन'चे घनश्याम पाटील हे काम खूप चांगल्या प्रकारे करतात. निर्मितीत कसलीही तडजोड न करता पुस्तक अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचविण्यात त्यांचा हातखंडा आहे. पुस्तकाच्या प्रस्तावनेत मी पुस्तकाविषयी भाष्य केले आहेच. त्यामुळे पुनरावृत्ती करणार नाही. आमच्या पुस्तकप्रेमी समूहात आम्ही सातत्याने लेखनविषयक नवनवीन प्रयोग करत असतो. त्याचे पडसाद मराठी साहित्यात उमटत आहेत.'' लेखक अनिल दातीर यांनी मनोगत व्यक्त करून त्यांचे प्रवासाचे रोचक, रोमहर्षक अनुभव सांगितले. प्रकाशक घनश्याम पाटील यांनी प्रास्ताविक केले. संकेत दातीर यांनी आभार मानले.

''चपराक प्रकाशनने अनेक लेखकांना प्रकाशझोतात आणलं आहे. त्यांच्या पुस्तकांचा दर्जा हा अतिशय उत्तम असतो आणि महाराष्ट्रातल्या प्रत्येक गावात आणि मराठी भाषिकांपर्यंत पोहोचविण्याचा अत्यंत प्रामाणिक प्रयत्न ते करतात. घनश्याम पाटील हा अतिशय सच्चा मित्र, सच्चा माणूस आहे. जो-जो उत्तम लिहितो त्याचं पुस्तक प्रकाशित व्हायलाच हवं, अशी भावना असणारा हा प्रकाशक आहे. स्वतः लेखकांना गाठून त्यांच्याकडून दर्जेदार लेखन ते करवून घेतात. त्यातून अनेक लेखक लिहिते झाले आहेत. अनिल दातीर यांच्यासारखा आमच्या साताऱ्यातला लेखक त्यांनी या पुस्तकाच्या निमित्ताने महाराष्ट्रासमोर आणला आहे.

**– विनोद कुलकर्णी, कार्याध्यक्ष, अ.भा. मराठी साहित्य संमेलन, सातारा**

अनिल दातीर यांनी जे विदेश दौरे केले त्याचे नियोजन अल्ताफभाई पठाण यांच्या 'ग्लोबल हॉलिडेज' या संस्थेने केले होते. हा धागा पकडत प्रकाशक घनश्याम पाटील म्हणाले की, ''हे प्रवासवर्णन वाचताना अल्ताफभाईंची धडपडही दिसून येते. विदेश सफरींचे आयोजन करताना ग्लोबल हॉलिडेज जी काळजी घेते ती उल्लेखनीय आहे. पुस्तकात त्याचे अनेक किस्से वाचायला मिळतात. त्यामुळे यापुढे हे पुस्तक वाचून फक्त पुणे-मुंबईच नाही तर गडचिरोली-गोंदियापासून लातूर-धाराशिवपर्यंत विदेश प्रवासास उत्सुक असणारे प्रवासी त्यांच्याशी संपर्क साधतील. त्यांच्या कामाची यात सुयोग्य दखल घेतली असल्याने त्यांच्या नव्या प्रवाशांचे स्वागत म्हणून ते हे पुस्तक त्यांना भेट देऊ शकतील.'' हे ऐकल्याबरोबर अल्ताफभाईंनी पुढाकार घेत या पुस्तकाच्या पन्नास प्रती विकत घेतल्या.

# इच्छामरण : कायदा आणि नैतिकतेचा संघर्ष



ॲड. स्वप्निल श्रोत्री
पुणे
८९५६८०१२४०

**भारतामध्ये इच्छामरण या अत्यंत संवेदनशील विषयावर पुन्हा एकदा राष्ट्रीय स्तरावर चर्चा सुरू झाली आहे. याला कारण ठरले आहे हरिश राणा या युवकाचे प्रकरण. तब्बल १३ वर्षे कोमात असलेल्या राणांना इच्छाम रणाची परवानगी देत सर्वोच्च न्यायालयाने भारताच्या इतिहासातील इच्छामरणासंदर्भातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय दिला आहे.**





हरिश राणा हे उत्तर प्रदेशातील गाझियाबाद येथील युवक आहेत. २०१३ साली ते शिक्षण घेत असताना एका इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून खाली पडले आणि त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. या अपघातानंतर ते कायमस्वरूपी कोमामध्ये गेले. डॉक्टरांच्या मते ते 'परमनंट व्हेजिटेटिव्ह स्टेट'मध्ये होते. म्हणजे त्यांना कोणतीही जाणीव नव्हती आणि ते स्वतःहून बोलू, हालचाल करू किंवा कोणत्याही गोष्टीला प्रतिसाद देऊ शकत नव्हते.

गेल्या अनेक वर्षांपासून त्यांना कृत्रिम आहार आणि वैद्यकीय उपकरणांच्या सहाय्याने जिवंत ठेवले जात होते. दीर्घकाळ उपचार करूनही त्यांच्या प्रकृतीत कोणतीही सुधारणा दिसून आली नाही. यामुळे अखेर त्यांच्या कुटुंबीयांनी न्यायालयाची मदत घेण्याचा निर्णय घेतला. राणांच्या वडिलांनी दिल्ली उच्च न्यायालयात अर्ज दाखल करून आपल्या मुलाला सन्मानाने मृत्यू देण्याची परवानगी मागितली. त्यांनी न्यायालयासमोर मांडले की राणा यांचे शरीर केवळ वैद्यकीय उपकरणांच्या सहाय्याने जिवंत ठेवले गेले असून त्यांच्या बरे होण्याची कोणतीही आशा उरलेली नाही.

दिल्ली उच्च न्यायालयाचा निर्णय –

या प्रकरणाची सुनावणी करताना दिल्ली उच्च न्यायालयाने संविधानाच्या अनुच्छेद २१ (सन्मानपूर्वक जगण्याचा अधिकार) याचा हवाला देत राणांच्या कुटुंबीयांची याचिका फेटाळून लावली. उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की 'सन्मानपूर्वक जगण्याच्या अधिकारामध्ये मरण्याचा अधिकार समाविष्ट होत नाही. हरिश राणा हे केवळ वैद्यकीय उपकरणांच्या आधारे जिवंत नसून ते स्वतंत्रपणे श्वास घेऊ शकतात.'

सर्वोच्च न्यायालयाचा हस्तक्षेप

दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात राणांच्या कुटुंबीयांनी सर्वोच्च न्यायालयात आवाहन केले. सर्वोच्च न्यायालयाने दिल्लीतील एम्स रुग्णालयातील डॉक्टरांचे एक पथक नेमून रुग्णाची वैद्यकीय तपासणी करण्याचे आदेश दिले. वैद्यकीय तज्ज्ञ समित्यांच्या अहवालांनुसार राणांच्या प्रकृतीत सुधारणा होण्याची शक्यता अत्यंत कमी असल्याचे स्पष्ट झाले. सर्व बाबींचा विचार करून सर्वोच्च न्यायालयाने राणांच्या निष्क्रिय इच्छामरणाला (पॅसिव्ह युथनेशिया) परवानगी दिली. याचा अर्थ असा की रुग्णाला कृत्रिम रीत्या जिवंत ठेवणारी जीवनरक्षक साधने आणि कृत्रिम आहार टप्प्याटप्प्याने काढून घेण्यास परवानगी देण्यात आली. न्यायालयाने आपल्या निर्णयात 'सन्मानाने मरण्याचा अधिकार' हा देखील मानवी हक्कांचा एक महत्त्वाचा भाग असल्याचे स्पष्ट केले.

इच्छामरण म्हणजे काय?

इच्छामरण म्हणजे एखाद्या असाध्य आजाराने किंवा अत्यंत वेदनादायक अवस्थेमुळे त्रस्त असलेल्या रुग्णाला त्याच्या संमतीने किंवा कायदेशीर प्रक्रियेनंतर सन्मानाने मृत्यू देण्याची प्रक्रिया होय. इंग्रजीमध्ये याला युथनेशिया असे म्हणतात. जेव्हा एखादा रुग्ण गंभीर आजार, कायमस्वरूपी कोमा किंवा असाध्य अवस्थेमुळे सामान्य जीवन जगू शकत नाही आणि बरे होण्याची कोणतीही शक्यता नसते तेव्हा त्याला अनावश्यक वेदना व कृत्रिम उपचारांपासून मुक्त करण्यासाठी मृत्यू स्वीकारण्याची परवानगी देण्याला इच्छामरण म्हणतात.

**इच्छामरणाचे प्रकार**

इच्छामरणाचे मुख्यतः दोन प्रकार आहेत.

**१. सक्रिय इच्छामरण (ॲक्टिव्ह युथनेशिया)**
यामध्ये डॉक्टर किंवा वैद्यकीय व्यक्ती थेट औषध देऊन रुग्णाचा मृत्यू घडवून आणतात.

**२. निष्क्रिय इच्छामरण (पॅसिव्ह युथनेशिया)**
यामध्ये रुग्णाला जिवंत ठेवणारी जीवनरक्षक उपकरणे, कृत्रिम आहार किंवा उपचार थांबवले जातात. त्यामुळे रुग्णाचा नैसर्गिकरित्या मृत्यू होतो.

**भारतातील कायदेशीर स्थिती :**

भारतामध्ये सक्रिय इच्छामरण पूर्णपणे बेकायदेशीर आहे मात्र काही विशिष्ट परिस्थितींमध्ये निष्क्रिय इच्छामरणास सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिली आहे.

या संदर्भातील काही महत्त्वाचे न्यायालयीन खटले पुढीलप्रमाणे आहेत.

१. अरुणा शानबाग विरुद्ध भारतीय संघराज्य (२०११) : हा भारतातील इच्छामरणासंबंधी सर्वात प्रसिद्ध खटला आहे. अरुणा शानबाग या मुंबईतील रुग्णालयात परिचारिका होत्या. १९७३ मध्ये त्यांच्यावर अत्याचार झाला आणि त्या कायमस्वरूपी कोमात गेल्या. त्यानंतर सुमारे ४२ वर्षे त्या कोमात होत्या. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने काही अटींसह निष्क्रिय इच्छामरणास मान्यता दिली. हा निर्णय भारतातील इच्छामरणाच्या कायदेशीर चर्चेतील एक महत्त्वाचा टप्पा ठरला.

२. गियान कौर विरुद्ध पंजाब राज्य (१९९६) : या प्रकरणात आत्महत्येला मदत करणे (आयपीसी कलम ३०६) या मुद्द्यावर चर्चा झाली. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की जगण्याचा अधिकार म्हणजे मृत्युचा अधिकार नाही मात्र न्यायालयाने असेही नमूद केले की काही परिस्थितींमध्ये सन्मानाने मृत्यू ही संकल्पना विचारात घेतली जाऊ शकते.

३. कॉमन कॉझ विरुद्ध भारतीय संघराज्य (२०१८)

या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने 'लिव्हिंग विल' या संकल्पनेला मान्यता दिली. लिव्हिंग विल म्हणजे एखादी व्यक्ती आधीच लेखी स्वरूपात सांगू शकते की भविष्यात ती गंभीर अवस्थेत गेल्यास तिला निष्क्रिय इच्छामरण द्यायचे की नाही... या निर्णयामुळे इच्छामरणाबाबत स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात आली.

इच्छामरण म्हणजे आत्महत्या नव्हे!

एखाद्या व्यक्तिने स्वतःच्या इच्छेने स्वतःचा जीव घेणे म्हणजे आत्महत्या होय. मानसिक ताण, नैराश्य, आर्थिक अडचणी, कौटुंबिक वाद, अपयश किंवा सामाजिक दबाव यांसारख्या विविध कारणांमुळे व्यक्ती आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेऊ शकते.

आत्महत्या ही केवळ वैयक्तिक समस्या नसून सामाजिक आणि मानसिक आरोग्याशी संबंधित एक गंभीर प्रश्न आहे.

भारतामध्ये आत्महत्येबाबत काही महत्त्वाच्या कायदेशीर तरतुदी आहेत. भारतीय दंड संहितेमधील कलम ३०९ नुसार पूर्वी आत्महत्येचा प्रयत्न हा गुन्हा मानला जात होता मात्र नंतर मानसिक आरोग्याच्या दृष्टीने या बाबीचा पुनर्विचार करण्यात आला.

मानसिक आरोग्य कायदा, २०१७ नुसार आत्महत्येचा प्रयत्न करणारी व्यक्ती मानसिक तणावाखाली असल्याचे गृहित धरले जाते. त्यामुळे अशा व्यक्तिला शिक्षा करण्याऐवजी वैद्यकीय उपचार आणि समुपदेशन देण्यावर भर दिला जातो मात्र एखाद्या व्यक्तिला आत्महत्येस प्रवृत्त करणे हा गंभीर गुन्हा आहे. भारतीय न्याय संहितेतील कलम १०८ नुसार आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या व्यक्तिवर कायदेशीर कारवाई होऊ शकते. अशा गुन्ह्यासाठी १० वर्षांपर्यंत कारावास आणि दंड अशी शिक्षा होऊ शकते.

**इच्छामरणाचे धोके :** इच्छामरण हा अत्यंत संवेदनशील आणि वादग्रस्त विषय आहे. काही परिस्थितींमध्ये तो वेदनामुक्तीचा मार्ग मानला जात असला तरी त्याचे काही गंभीर धोके देखील आहेत.

१. **गैरवापराची शक्यता :** कुटुंबीय आर्थिक किंवा वैयक्तिक कारणांमुळे रुग्णावर इच्छामरणासाठी दबाव टाकू शकतात.

२. **वैद्यकीय चुकांची शक्यता :** डॉक्टरांचे निदान चुकीचे ठरल्यास किंवा रुग्ण बरा होण्याची शक्यता असतानाही इच्छामरण दिले गेले तर ते अपरिवर्तनीय नुकसान ठरू शकते.

३. **नैतिक आणि धार्मिक आक्षेप :** अनेक धर्मांनुसार मानवी जीवन पवित्र मानले जाते. त्यामुळे जाणून–बुजून मृत्यू देणे नैतिकदृष्ट्या चुकीचे मानले जाते.

४. **रुग्णाच्या निर्णयावर दबाव :** कधी कधी रुग्णाला कुटुंबीयांवर ओझे वाटू लागते आणि त्या भावनेतून तो इच्छामरणाची मागणी करू शकतो.

५. **वैद्यकीय नैतिकतेवर परिणाम :** डॉक्टरांचे मुख्य कर्तव्य रुग्णाचे जीवन वाचवणे असते. इच्छामरणामुळे या वैद्यकीय नैतिकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते.

६. **समाजावर परिणाम :** जर इच्छामरण सहज उपलब्ध झाले तर गंभीर आजार किंवा अपंगत्व असलेल्या व्यक्तिंबाबत समाजाची संवेदनशीलता कमी होण्याची भीती व्यक्त केली जाते.

७. **कायदेशीर गुंतागुंत :** इच्छामरणाच्या प्रकरणांमध्ये कायदेशीर प्रक्रिया गुंतागुंतीची असते. त्यामुळे निर्णय घेण्यात विलंब किंवा वाद निर्माण होऊ शकतात.

हरिश राणा प्रकरणाच्या निमित्ताने भारतातील इच्छामरणाच्या कायदेशीर चौकटीबाबत पुन्हा एकदा व्यापक चर्चा सुरू झाली आहे. यापूर्वीही न्यायालयांनी काही मार्गदर्शक तत्त्वे दिली होती मात्र प्रत्यक्ष प्रकरणात दिलेला हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. या निर्णयामुळे भविष्यात अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये न्यायालयीन आणि वैद्यकीय प्रक्रिया अधिक स्पष्ट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. एकूणच, या प्रकरणामुळे भारतात मानवी हक्क, वैद्यकीय नैतिकता आणि कायदा यांच्यातील संतुलनाबाबत नवी चर्चा सुरू झाली आहे. हा निर्णय केवळ एका व्यक्तिपुरता मर्यादित नसून भविष्यातील अनेक प्रकरणांसाठी मार्गदर्शक ठरणार असल्याचे कायदेतज्ज्ञांचे मत आहे.

'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी दै. सामना प्रेस सिंहगड रोड, वडगाव खुर्द, पुणे ४११०४१ येथे छापून चपराक प्रकाशन, ४०२, चौथा मजला, वेलस्प्रिंग, बावधन मार्केट यार्ड, बावधन बुद्रुक, पुणे ४११०२१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : घनश्याम वसंतराव पाटील. (अंकातील मजकुराशी संपादक कदाचित सहमत असतीलही; वाद–विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत.) भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२/८७६७९४१८५०. ई मेल : info@chaprak.com



सचिन माथेफोड
थेऊर, पुणे
८९७५३२९७९७

# तिचा चेहरा जळाला की आपल्या समाजाचा चेहरा उघडा पडला?

## नकार सहन न करणाऱ्या पिढीचं भयावह रूप



अहिल्यानगरच्या संगमनेर तालुक्यात एका निष्पाप लहान मुलीवर ॲसिड फेकलं जातं. ही बातमी आपण वाचतो, क्षणभर मन सुन्न होते, मनात संताप उसळतो आणि काही वेळाने पुन्हा आपल्या दैनंदिन जीवनात गुंतून जातो! पण त्या मुलीचं आयुष्य तिथेच थांबतं का? तिच्या चेहऱ्यावरच नाही तर तिच्या संपूर्ण अस्तित्वावर आयुष्यभरासाठी जखमा उमटतात. गेल्या दशकभरात अशा शेकडो घटना घडलेल्या आहेत. यामागे अनेक कारणे आहेत. कधी एकतर्फी प्रेम तर कधी वैयक्तिक भांडणे तर कधी राजकीय, सामाजिक, कौटुंबिक हेवेदावे. काल घडलेल्या या घटनेमुळे पुन्हा एकदा समाजाचा नाटकी बुरखा फाटला गेला आहे.

प्रश्न इतकाच नाही की हा गुन्हा कोणी केला? प्रश्न आहे, हा गुन्हा घडूच कसा दिला?

आज आपण ज्या समाजात जगतो, तिथे प्रगतीचे मोठ-मोठे दावे केले जातात. तंत्रज्ञान, शिक्षण, विकास याबाबत आपण अभिमानाने बोलतो पण दुसऱ्या बाजूला एका लहान मुलीवर ॲसिड फेकलं जातं आणि आपली सगळी प्रगती एका क्षणात उघडी पडते कारण खऱ्या अर्थाने समाजाची प्रगती ही रस्ते, इमारती किंवा मोबाईल नेटवर्कने मोजली जात नाही. ती मोजली जाते माणुसकीने, संवेदनांनी आणि स्त्रीच्या सुरक्षिततेने.

आजच्या तरुणांच्या मनात एवढी क्रूरता का साचते आहे? नकार मिळणं, अपयश येणं ही आयुष्याची नैसर्गिक प्रक्रिया आहे पण ती स्वीकारण्याची ताकद आपण आपल्या मुलांना दिली आहे का? की आपण त्यांना नकळत शिकवलं, 'तू हरू नकोस, तुला हवं ते मिळालंच पाहिजे!'

जेव्हा ही अपेक्षा पूर्ण होत नाही, तेव्हा राग निर्माण होतो आणि त्या रागाचं रूपांतर हिंसेत होतं. प्रेमाच्या नावाखाली चालणारी ही विकृती अधिक भयानक आहे. 'प्रेम' हा शब्द जिथे आदर, समजूतदारपणा आणि स्वातंत्र्य यांच्याशी जोडला जायला हवा, तिथे तो मालकीहक्क आणि अहंकाराशी जोडला जातो. 'ती माझी नाही, तर कोणाचीच नाही' ही मानसिकता फक्त एका व्यक्तिची नसते, ती समाजाच्या विचारांमधूनच जन्म घेते.

चित्रपट, वेब सिरीज आणि सोशल मीडियानेही या मानसिकतेला खतपाणी घातलं आहे. पाठलाग, जबरदस्ती, आक्रमक वर्तन यांना 'रोमँटिक' दाखवलं जातं. तरुण मनं हे पाहतात, आत्मसात करतात आणि मग वास्तवात त्याची पुनरावृत्ती करतात. आपण मनोरंजनाच्या नावाखाली काय पेरतो आहोत, याचा विचार करण्याची वेळ आता निघून गेली आहे. ती संपली आहे पण या सगळ्यापेक्षा अधिक चिंताजनक बाब म्हणजे भीतीचा अभाव. कायद्याची भीती उरलेली नाही. ॲसिडसारखं घातक द्रव्य अजूनही सहज मिळतं. नियम आहेत पण अंमलबजावणी शिथिल आहे. गुन्हा घडतो, निषेध होतो, मोर्चे निघतात, आश्वासनं दिली जातात आणि मग सगळं शांत होतं.

न्याय मिळतो पण उशिरा. कधी कधी खूप उशिरा! आणि तोपर्यंत पीडितेचं आयुष्य पूर्णपणे बदललेलं असतं.

महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यातही अशा घटना वारंवार घडतात. ही केवळ लाजिरवाणी गोष्ट नाही तर ती आपल्या व्यवस्थेच्या अपयशाची जाहीर कबुली आहे. दोष फक्त त्या एका आरोपीचा नाही. दोष त्या कुटुंबाचाही आहे, जिथे मुलांच्या भावनांकडे दुर्लक्ष केलं जातं. दोष त्या शिक्षण व्यवस्थेचाही आहे, जिथे गुणांना महत्त्व दिलं जातं पण मूल्यांना नाही. दोष त्या समाजाचाही आहे, जो चुकीकडे पाहूनही गप्प बसतो आणि दोष त्या राजकीय इच्छाशक्तिचाही आहे, जी प्रत्येक घटनेनंतर फक्त निवेदनं देऊन थांबते.

आपण वारंवार विचारतो, 'अशा घटना थांबतील कशा?' पण खरा प्रश्न आहे, आपण त्या थांबवण्यासाठी खरंच काय करत आहोत?

घराघरात संवाद हवा. मुलांना 'नकार स्वीकारणं' शिकवलं पाहिजे. शाळांमध्ये मूल्यशिक्षणाला पुन्हा केंद्रस्थानी आणलं पाहिजे. माध्यमांनी जबाबदारी स्वीकारली पाहिजे आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे कायद्याची अंमलबजावणी कठोर आणि त्वरित झाली पाहिजे. ॲसिड विक्रीवर पूर्ण नियंत्रण आणि अशा गुन्ह्यांसाठी जलद न्यायप्रक्रिया ही केवळ मागणी नाही, ती अत्यावश्यकता आहे. पण या सगळ्यापलीकडे एक प्रश्न अजूनही उभा आहे. आपण माणूस म्हणून अपयशी ठरत आहोत का? आज अहिल्यानगरमध्ये ज्या मुलीवर ॲसिड फेकलं गेलं, ती केवळ एक व्यक्ती नाही. ती आपल्या समाजाच्या जखमेचं जिवंत प्रतीक आहे. तिच्या चेहऱ्यावर उमटलेले व्रण हे आपल्या संवेदनांच्या मृत्युची साक्ष देत आहेत.

जर आपण आजही बदललो नाही तर उद्या ही जखम आणखी खोल होणार आहे.

आणि कदाचित त्या वेळी प्रश्न विचारायलाही आपण उरणार नाही.

आता तरी जागं व्हायचं का की अजून एका निरागस चेहऱ्याची वाट पाहायची?

---

**धनंजय पवार,** सहाय्यक वनरक्षक


# माझं महाबळेश्वर

प्रवास म्हणजे पाऊलांनी नोंदलेली वाट नव्हे तर मनाने जपलेली आठवण असते. या प्रत्येक आठवणींच्या कळ्यांना सौम्य स्पर्श देत लेखक श्री. अनिल मानसिंग सोळुंके यांचे 'माझे महाबळेश्वर' हे पुस्तक वाचकास निसर्गाच्या अथांग, शांत आणि प्रेमळ कुशीत घेऊन जाते. सह्याद्रीच्या दरी-दऱ्यांत धुक्याच्या रेशमी पट्ट्या उलगडतात, वाऱ्याच्या झुळकीत स्ट्रॉबेरीचा सुगंध विरघळतो आणि दूरवरून ऐकू येणाऱ्या शांततेच्या संगीताला लेखकाने शब्दांची सुरेल साथ दिली आहे. या पुस्तकातील प्रत्येक प्रकरण-थकलेल्या लालपरीपासून ते संध्याकाळच्या सोनपावलांनी उजळलेल्या बॉम्बे पॉईंटपर्यंत-जीवनाच्या एखाद्या सूक्ष्म सत्याला हलकेच स्पर्श करून जाते.

महाबळेश्वरचा निसर्ग येथे फक्त वर्णन नाही तर अनुभव बनून येतो. जावळीच्या खोऱ्याच्या नि:शब्द इतिहासात, प्रतापगडाच्या अभिमानात, पाच नदींच्या पवित्र प्रवाहात आणि पाचगणी-वाईच्या रमणीयतेत वाचकाचे मन नकळत हरवून जाते. लेखकाची लेखणी जितकी साधी तितकीच संवेदनशील. ती कधी प्रवास सांगते, कधी भावनांचा हात धरते, तर कधी वाचकाच्या अंतर्मनात एक शांत दिवा पेटवते.

हे पुस्तक सांगते - की प्रवास बाहेरचा असतो पण त्यातून उमलणारा बदल मात्र आतला असतो. निसर्गाला मनापासून जाणणाऱ्या, सह्याद्रीत स्वतःला शोधणाऱ्या आणि जीवनाच्या वाटेवर थोडा विरंगुळा, थोडी शांतता, थोडी प्रेरणा शोधणाऱ्या प्रत्येकासाठी माझे महाबळेश्वर ही एक मन:शांती देणारी सोबत ठरते.

वाचकांना या प्रवासाचा अनुभव घेता घेता स्वतःचा एक छोटासा आतला महाबळेश्वर सापडो-हीच लेखकाकडून मनापासून दिलेली भेट. लेखकास भावी लेखन निर्मितीसाठी खूप साऱ्या शुभेच्छा!




चपराक प्रकाशनच्या वाचनिय पुस्तकांची ग्रंथसूची पाहण्यासाठी स्कॅन करा.

# राम नामाची महती

राम या शब्दात प्रचंड ऊर्जा, अलौकिक शक्ती आहे. त्यामुळे अंतःकरणात आणि शरीरात एक वेगळ्याच प्रकारचा उत्साह संचारतो. आपल्याही मुखातून रामनाम बाहेर पडते. हात भक्तिभावाने जोडले जातात; कारण राम सर्वांच्या मनात, हृदयात वसलेला आहे. रत्नाकरला रामनामाची संथा, मंत्र देऊन अंतर्धान पावलेले नारदमुनी अनेक वर्षानंतर त्याच मार्गाने जात असताना राम... राम... हा मंत्र त्यांच्या कानावर पडला. नारदमुनींनी तो आवाज कुठून येतोय याचा शोध घेतला. आवाज मानवाचा होता परंतु कुणी दिसत नव्हते. एकवेळ अशी आली की, त्या आवाजाचा मागोवा घेताना त्यांच्या लक्षात आले की, त्या परिसरातील झाडे, वेली, पक्षी इतकेच काय पण दगडमातीपासूनही तो रामनामाचा ध्वनी येत आहे. ध्वनीचा शोध घेत असताना बाजूला असलेले एक वारूळ त्या ध्वनी-प्रतिध्वनीचे केंद्र असल्याचे लक्षात येताच मुनीनी ते वारूळ बाजूला केले आणि सर्वांना महर्षी वाल्मिकी मिळाले.

राम या शब्दातील दोन अक्षरे 'राम' अशी न उच्चारता 'मरा' अशी उच्चारली तरी प्रभू रामचंद्रांची कृपा झाल्याशिवाय राहत नाही. याची प्रचिती आपणास महर्षी नारद यांच्या सूचनेनुसार रत्नाकर नावाचा कोळी चक्क महर्षी वाल्मिकी होऊन रामायणासारखा अजरामर ग्रंथ लिहितो यावरून येते.

जर अंतःकरणात खरेच राम नामाची भक्ती असेल तर सोबत आजूबाजूचा परिसर राममय होऊन जातो. मनात असलेले राम ओठांवर येण्यासाठी कुठल्याही जागेची, विशेष आसनाची, वेळेची आवश्यकता नाही. अगदी स्मशानभूमीतही रामनामाचा उच्चार होतो. ही दोन अक्षरे जिथे उच्चारली जातात, तिथला परिसर आपोआप पवित्र, स्वच्छ होतो. इच्छा झाली की, राम नाम मुखी येते. श्रीरामाचे भक्त मनोभावे रामनाम घेत असले तरीही रामनाम न घेणाऱ्या आणि श्रीरामाचा मुख्य शत्रू असलेल्या रावणाच्या आणि कुंभकर्णाच्या झालेल्या संवादातून श्रीराम ाचा महिमा लक्षात येईल. तो प्रसंग असा...



राम-रावण युद्ध सुरू असताना कुंभकर्णाला जागे करून सभागृहात आणण्यात आले तेव्हा सारी परिस्थिती लक्षात येताच कुंभकर्ण रावणाला म्हणाला, ''ज्येष्ठ बंधू रावण, एक सांगा, सीतेला ज्यासाठी पळवून आणले ते कार्य साध्य झाले का?''

''नाही अनुज, नाही. सीता त्यासाठी तयार होणार नाही. श्रीराम एकपत्नी आहे तशीच सीताही पतिव्रता आहे.''

''ज्येष्ठ बंधो, कपटनीतीचा अवलंब का करत नाही? आपण श्रीरामाचे रूप धारण करून जा. म्हणजे कार्यसिद्धी होईल.''

''नाही. तसे होणार नाही. मी कपट करून रामाचे रुप घेऊन सीतेजवळ गेलो तरी मी काही करू शकणार नाही; कारण रामरूप धारण करताच मी रामाप्रमाणे एकपत्नी अर्थात मंदोदरीचा होऊन जाईन आणि सीतेपाशी न जाता तसाच परतून येईन!'' हा आहे रामनाम ाचा महिमा!



नागेश शेवाळकर
९४२३१३९०७१

जटायूसारखा एक पक्षी बलाढ्य रावणाशी लढला होता तो केवळ त्याच्या मनात राम वसलेला होता म्हणून. अथांग समुद्रावर सेतू बांधताना दोन दगडांमध्ये असणारी पोकळी भरून काढण्यासाठी चिमुकली खार मदत करते तेव्हा तिच्या पाठीशी कुणाची शक्ती असते? प्रभू रामचंद्र तिच्या पाठीशी नव्हे, तर हृदयात असतात!

सागरी सेतू बांधतानाचा दुसरा प्रसंगही रामनामाचे महत्त्व स्पष्ट करणारा आहे. वानरसेना मोठमोठ्या शिळा समुद्रात टाकत होते त्या वेळी रामनामाचा गजर सुरू होता. श्रीराम ते सारे कौतुकाने पाहत असताना त्यांच्या लक्षात एक गोष्ट आली की, प्रत्येक सैनिक त्या शिळेवर श्रीराम असे लिहून टाकत होता. ती प्रत्येक शिळा समुद्राच्या पाण्यावर तरंगत होती. ते पाहून श्रीरामाचीही इच्छा झाली की, आपणही एक शिळा टाकावी. श्रीरामानेही एक शिळा उचलून समुद्रात टाकली. आश्चर्य म्हणजे ती शिळा पाण्यावर न तरंगता पाण्यात बुडाली. ते पाहून श्रीराम अधिकच आश्चर्यचकित झाले. जवळ उभा असलेला हनुमंत श्रीरामाला वंदन करून म्हणाला, ''प्रभो, आपण टाकलेली शिळा तरंगणार नाही; कारण त्यावर श्रीराम लिहिलेले नाही. प्रभू हा आपल्या नामाचा महिमा आहे. ज्याच्या जवळ रामनाम नाही तो हमखास बुडणार!''

पित्याने दिलेली वचनपूर्ती करण्यासाठी वनवास स्वीकारणारा राम, आदर्श पती, एकवचनी राम, पराक्रमी, परोपकारी, आदर्श राजा अशी प्रभू रामचंद्राची ख्याती आहे. सुख असेल, दुःख असेल, आनंदाच्या प्रसंगी आई सोबत राम हा शब्दही आपोआप ओठांवर येतो; कारण तो मनामनांत वसलेला आहे.



संदीप वाकचौरे
साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ
८३२९३२८४७०

# मूर्तीची पूजा... जिवंताची नाही!

भगवान ओशो एका शहरात मुक्कामी होते. त्या गावात एक तर्कशास्त्राचे सेनानिवृत्त प्राध्यापक राहत होते. तो माणूस विचित्र आहे, असे गावातील लोक मानत होते. अर्थात तर्कशास्त्राचा प्राध्यापक म्हटल्यावर वर्तनात विचित्रपणा येणार यात शंका नाही. तर्कशास्त्राचा प्राध्यापक आणि त्यात सेवानिवृत्त त्यामुळे प्रत्येक गोष्टीचा तर्काने विचार करणे त्याच्या स्वभावात होते. त्याउलट सामान्य माणसांचे असते. त्यामुळे लोकांचे जगणे आणि या प्राध्यापकांचे वर्तन यात बरेच अंतर होते. हा फरक मोठा होता त्यामुळे लोकांचे आणि प्राध्यापक यांचे विचार जुळण्याची शक्यता अजिबात नव्हती. लोक मात्र त्यांच्या प्रत्येक वर्तनाला विचित्र वागणं असंच म्हणायचे. त्यांच्याबद्दल ओशोना लोकांनी किती तरी गोष्ट सांगितल्या होत्या. त्यामुळे ओशोंना देखील त्याबद्दल उत्सुकता निर्माण झाली होती. आपल्याला हा माणूस एक दिवस भेटेल असे वाटले होते.

एक दिवस झालेही तसेच. ओशा त्यांच्या घरासमोरून जात होते. प्राध्यापक महाशय एका टिनच्या डब्याने समोरच्या झाडांना पाणी घालत होते. ते बराच वेळ डबा झाडांवर धरून होते मात्र त्या डब्यातून एकही थेंब पाणी बाहेर पडत नव्हते. हा माणूस असा का करतो आहे? असा प्रश्न अनेकांना पडत होता. त्याप्रमाणे ओशोना देखील पडला. पाणी पडत नव्हते आणि हा माणूस बराच वेळ डबा धरून आहे, हे पाहिल्यावर ओशो त्यांना म्हणाले की, ''अहो महाशय, डब्यातून एकही थेंब पाणी पडत नाही. तुम्ही जो डबा झाडांवर धरला आहे त्याला कोणत्याच प्रकारचे छिद्र नाही.'' तेव्हा ते प्राध्यापक म्हणाले, ''तुम्ही जे सांगता आहात ते मला अगोदरच माहीत आहे पण तुम्हाला एक गोष्ट माहीत नाही की, मी ज्या फुलांच्या झाडांवर या डब्यातून पाण्याची धार धरली आहे ती फुले आणि फुलांची झाडे तरी खरी कोठे आहेत? मी ज्या झांडावर पाणी मारतो आहे, ती सारी झाडे आणि फुले ही प्लॅस्टिकची आहेत. मुळात जी फुले प्लॅस्टिकची आहेत, ती कोमेजण्याचा धोका नसतो. ती फुले कधीच सुकत नाहीत, वाळत नाहीत, खराब होत नाहीत. जेव्हा पाहावे तेव्हा ही फुले सारखीच असतात. त्यामुळे इतर फुलांसारखी सकाळी फुले उमलणार आणि सांयकाळी ती मावळणार असं काही घडण्याची शक्यता नाही.

आपल्याला नेहमीच अशीच खोटी फुले हवी असतात. त्यांच्यापासून काहीच लाभ नाही. त्यांचा सुगंध येत नाही. एका अर्थाने फायदा काहीच नाही. सारेच खोटे आपल्याला हवे असते. आपल्या जीवनात देखील तसेच हवे असते. जे जिवंत आहे ते सुकण्याचा धोका असतो. ते जिवंत राहावे म्हणून पाणी घालणे आले, खत देणे आले; मात्र जिवंत नसेल तर नाटक केले तरी चालते. आपले जीवनही तसेच आहे की, सकाळी फुलायचे आणि रात्री मावळायचे. मग आपल्याला आपल्यासारख्याच जिवंत असलेल्या माणसांची पूजा करणे आवडत नाही कारण त्याच्यात आणि आपल्यात काहीच फरक पडत नाही. त्यामुळे आपल्याला देखील पूजेसाठी दगडाची मूर्ती हवी असते. ती फुलांसारखी नेहमीच जिवंत असल्याचा भास असतो. ती कधीच कोमेजत नाही. तिला जन्म नाही, त्याप्रमाणे मृत्युदेखील नाही. ती मूर्ती खोटी असते आणि आपल्याला खोट्या मूर्तीची पूजा करणे आवडत असते. आपल्याला खऱ्यापेक्षा खोट्याची पूजा करणे जास्त पसंत असते. जिवंत असलेल्या माणसाला त्याच्यासारख्याच जिवंत असलेल्या माणसाची पूजा करायला आवडत नाही कारण त्यात आपल्या अंहकाराला ठेस लागण्याची शक्यता अधिक असते.

आपल्याला जिवंत माणसाकडून धोका होऊ शकतो. एखादा जिवंत साधू आपल्याला भेटला, आपल्याला त्याला जपावे लागते मात्र त्या गुरूची मूर्ती असेल तर आपल्याला कोणताच धोका नाही कारण त्या मूर्तीला आपण म्हणू तसे वागणे भाग पाडत असतो. आपण तिला हवे तेव्हा नैवद्य दाखवणार, आपल्याला हवे तेव्हा तिची पूजा करणार. आपण हवे तेव्हा आपणाला हव्या त्या गोष्टी देवाच्या नावाखील करत असतो. देवाला काय आवडते आणि काय आवडत नाही हे आपणच ठरवत असतो. देवाला देवघरात ठेवले की झाले पण आपल्याला हवे त्या पद्धतीने वागता येते. आपण अशा मूर्तीसमोर वाकून नमस्कार करू शकतो. त्या मूर्तीसमोर वाकताना आपल्या अहंकाराला कोणताही धक्का लागत नाही मात्र तेच आपल्याला एखाद्या जिवंत व्यक्तिपुढे वाकायचे असेल तर आपल्यासमोर अडचण निर्माण होण्याचा धोका आहे कारण ती जिवंत व्यक्ती आपल्या अहंकाराला ठेच लावू शकते. त्यामुळे आपल्याला अहंकार सोडून जायचे असे वाटत असले तरी आतून मात्र सोडावा वाटत नाही म्हणून आपण मूर्तीची पूजा करत असतो. केव्हा तरी जिवंत माणसांची पूजा करण्याचा प्रयत्न केला तर आपल्याला त्यात काय एवढे, कारण ती व्यक्ती तर आपल्याचसारखी आहे असे वाटत असते. मूर्तीची पूजा करण्यात काहीच अडचण नसते. आपल्या मनाप्रमाणे आणि आपल्या अहंकाराला कोणताच धक्का न लावता जे करता येईल, त्या सर्व गोष्टी करण्यात आपल्याला अधिक रस असतो.

# साहित्य हरले, राजकारण जिंकले!



चंद्रलेखा बेलसरे-जगताप, पुणे
९८५०८९५०५१

**साप्ताहिक 'चपराक'चा अंक हाती आला. 'साहित्य परिषदेत 'भाजप' विजयी' ही शीर्षस्थ बातमी वाचली. साम, दाम, दंड, भेद नीतीचा वापर करत साहित्य संस्था ताब्यात घ्यायच्याच या ईर्षेने पेटलेल्या भारतीय जनता पक्षाने महाराष्ट्र साहित्य परिषदेवर विजय मिळवला. भाजपचे अनेक नगरसेवक, आमदार, खासदारही साहित्य परिषदेच्या निवडणुकीत सक्रिय झालेले पहिल्यांदाच दिसून आले. 'साहित्य हरले, राजकारण जिंकले' अशीच भावना साहित्य रसिकांमध्ये आहे, अशा आशयाची ती बातमी होती.**

खरं तर जेव्हा साहित्य परिषदेची निवडणूक जाहीर झाली, तेव्हापासूनच अपरिचित नंबरवरून फोनवर फोन यायला सुरुवात झाली होती. एखादी निवडणूक असल्यास आणि दोन पॅनल समोरासमोर उभे ठाकल्यावर आपले पॅनल जिंकून यावे म्हणून तसा प्रयत्न होणे हे काही गैर नव्हते. मतपत्रिका मिळण्यापूर्वी पासूनच संपर्क साधायला सुरुवात झाली होती. ते ही साहजिकच होते. नंतर मतपत्रिका मिळाल्यावर 'आम्ही मतपत्रिका घेण्यासाठी तुमच्या घरी येतो' असे म्हटल्यावर मात्र आश्चर्य वाटल्याशिवाय राहिले नाही. खरं तर मतदार पोस्टाने किंवा प्रत्यक्ष जाऊन मतपत्रिका साहित्य परिषदेत जमा करू शकत होते पण यावेळी हा वेगळा प्रकार पाहायला मिळाला अन लक्षात आले की, यावेळची निवडणूक प्रतिष्ठेची आणि चुरशीची होणार! काही हरकत नाही. जेव्हा दोन पॅनल एकमेकांसमोर उभे राहिले तर लढत चुरशीची होणार हे स्पष्टच होते पण नंतर नंतर ही चुरस वाढतच गेली आणि परिवर्तन उत्कर्ष आघाडीच्या विरुद्ध जंग जंग पछाडत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने त्यांची यंत्रणा कार्यान्वित केली. एकेक मतपत्रिका मिळावी म्हणून स्थानिक नगरसेवक मतदारांकडे सातत्याने चकरा मारत होते, हे ही समजले. काहींना धमक्या देण्यात आल्या, काही ठिकाणी पैशांचे वाटप देखील करण्यात आले, हेही कानावर आले पण विश्वास बसत नव्हता कारण ही साहित्य परिषदेची निवडणूक होती. राजकारण सोडून राजकीय लोक ह्या निवडणुकीत कशाला डोकावतील? असेच वाटत होते पण असे झाले खरे!

पुढे पुढे तर मतमोजणीच्या वेळी वेगळेच प्रकार घडत गेले. मतमोजणी करायच्या वेळी मतपत्रिका बाहेर नेऊन खाजगी प्रेसवाल्याकडून कापून आणायचे ठरले. हे अत्यंत धोकादायक होते कारण तसे करताना घोळ होण्याची शक्यता होती. त्यापेक्षा कटिंग मशीन परिषदेत आणून तेथेच कापून घेऊ यात, अशी भूमिका मांडणाऱ्या पॅनलच्या मागणीला नकार देण्यात आला. मतमोजणी करताना उमेदवार किंवा त्यांचा प्रतिनिधी अशा एकाला मतमोजणी कक्षात बसता येणार होते. तसे बसू देखील दिले. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी नेमलेले प्रतिनिधी त्यांच्यासमोर बसून विजयी उमेदवाराचे नावे वाचून दाखवत होते. जेव्हा सलग एकाच पॅनलचे उमेदवार विजयी घोषित होऊ लागल्यावर विरुद्ध पॅनलच्या उमेदवारांनी, या पत्रिकेवर ज्यांची नावे आहेत, त्या आम्हाला दाखवा असा आग्रह धरल्यावर, आमचे काम आम्हाला करू द्यात असे सांगण्यात आले अन् भाजप आणि संघप्रणित पॅनल जिंकून आल्याचे जाहीर झाले. विरुद्ध पॅनलकडून फेरमतमोजणीची मागणी केल्यावर ती मागणी देखील फेटाळण्यात आली. अशाप्रकारे महाराष्ट्र साहित्य परिषदेची निवडणूक संपन्न झाली आणि राजकारण्यांचे साहित्य क्षेत्रात काय काम? असे विचारणाऱ्या साहित्यिक आणि साहित्यप्रेमींना धक्काच बसला. खरंच हा धक्का अजूनही पचनी पडत नाही.

अर्थात निवडणुकीत हार-जित चालतच असते. कोणी तरी जिंकणार, कोणी तरी हरणार, हे निश्चित असते पण निवडणुका जर पारदर्शी असतील तर त्या स्वीकारणे जड जात नाही पण निवडणुकीपूर्वीपासून जे काही चालले होते आणि मतमोजणीच्या वेळी जे काही घडले, त्यावरून हे सारे राजकीय हस्तक्षेपाशिवाय झाले नसावे, असे वाटते.

या सर्व बातम्या वर्तमानपत्रातून स्पष्ट करण्यात आल्या. प्रत्येक नागरिकाने त्या वाचल्या. अनेकांनी संताप व्यक्त केला. कित्येक जण हळहळले देखील कारण अद्यापपर्यंत कोणत्याच राजकीय पक्षाने साहित्यक्षेत्रात घुसखोरी केलेली नव्हती. इतर कोणत्याही क्षेत्रात राजकीय लोकांचा सहभाग असला तरी साहित्यक्षेत्र मात्र त्यापासून अलिप्त होते. त्यात केवळ साहित्यिकांच्या विचारांना, मत प्रवाहाला प्राधान्य दिले जात होते पण ही अजबच निवडणूक पाहायला मिळाली. तसेच स्वतःला साहित्यिक म्हणवणाऱ्या लोकांनी चक्क राजकारण्यांची मदत घेऊन निवडणूक जिंकावी, यासारखी शोकांतिका दुसरी नाही. उद्या याचे दुष्परिणाम काय होतील? याची तरी तमा बाळगायला हवी होती. अलीकडे हे कपडे घालू नका, हे खाऊ नका, एवढी पोरं पैदा करा, असे फतवे काढणाऱ्यांच्या वळचणीला जर साहित्य परिषद जाऊन बसली तर साहित्यिकांच्या अभिव्यक्तिचे काय होणार? आपल्याकडे वेगवेगळ्या प्रकारची साहित्य निर्मिती होत असते. त्यात समाजव्यवस्थेवर प्रहार करणारे साहित्यिक देखील असतात. त्यांचे काय होणार? एखादा साहित्यिक रोज घडणाऱ्या घटनांवर आधारित आपल्या साहित्यातून भाष्य करत असतो, खरे दृश्य समाजासमोर मांडत असतो, त्यावर सुद्धा बंदी घालण्यात येऊ शकते. त्या लिखाणावर देखील आक्षेप घेण्यात येऊ शकतो अन राजकारण्यांच्या हातचे बाहुले बनल्यावर त्यांना जे अभिप्रेत असेल तसेच निर्णय या नवीन पदाधिकाऱ्यांना घ्यावे लागतील, याची शक्यता देखील नाकारता येत नाही.

एखादेवेळी परस्पर चुरस होऊन एखादे पॅनल निवडून आले असते तर ते स्वीकारण्यात काहीच वैषम्य वाटले नसते. ते देखील आनंदाने स्वीकारले गेले असते पण राजकारण्यांच्या कुबड्या घेऊन जे काही झाले ते खरंच गैर झाले, असे आता वाटत आहे. अगदी संघ आणि भाजपाचे समर्थक असलेल्या कित्येकांनी देखील याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे, हे दुर्लक्षून चालणार नाही कारण ते देखील साहित्यिक आहेत, साहित्यप्रेमी आहेत. निदान साहित्याच्या क्षेत्रात तरी असे व्हायला नको होते, असे त्यांना वाटते पण काय करणार? कालाय तस्मे नमः! आता जे झाले ते झाले. आता नवीन पदाधिकाऱ्यांकडून एवढीच माफक अपेक्षा राहील की, निदान आमच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर तरी घाला घालू नका. द्वेषाचे, सूडाचे राजकारण करू नका. ज्या लोकांनी आपले साहित्यिक विश्व समृद्ध केले ते क्षेत्र राजकारण्यांच्या अधिपत्याखाली जाऊ देऊ नका. आम्हाला आमची स्वतंत्र साहित्यिक, वैचारिक भूमिका मांडू द्यात आणि येथून पुढे साहित्यविश्वाची भरभराट घडवून आणा. त्यासाठी तुम्हाला शुभेच्छा! ■■

# पुस्तकच समदं राहतं का?



भरत विठ्ठल पाटील
नाशिक
९६६५९११६५७

मज आवडते मनापासूनी शाळा

दुपारची वेळ असल्यानं चौथीच्या वर्गात मराठी कविता शिकवित होतो. कवितेच्या अनुषंगाने काही अभ्यासपूरक बाबी सांगत असतानाच ईश्वरी अचानक म्हणाली, ''सर, पुस्तकच समदं राहतं का?''

क्षणभर वर्गात शांतता पसरली. तिच्या आवाजात प्रश्नापेक्षा अधिक काही तरी होतं हे जाणवत होतं. मनात साचलेली खंत, गोंधळ आणि एक कोवळं अस्वस्थपण. ती बोलत होती, ''सर,पुस्तकासारखं थोडंच जगता येतं...!''

तिच्या बोलण्याचा कल, वय पाहता माझ्यासाठी हे समजून घेणं गरजेचं वाटलं, की नेमकं कारण काय असेल..? नंतर बोलता बोलता कळलं की तिच्या आजींनी तिला अभ्यासावरून रागावलं होतं. खेळायला जाऊ दिलं नव्हतं. तिच्या मनात प्रश्न निर्माण झाला अभ्यासच सगळं असतं का? माझ्या भावनांचं काय? माझ्या खेळण्याचं, हसण्याचं, मनासारखं काही करण्याचं महत्त्व नाही का?

हा प्रश्न छोटा होता; पण त्यातून बालमनाची नाजूक जडणघडण डोकावून दिसत होती. बालमानसशास्त्रज्ञ जीन पियाजे यांच्या मते, या वयातील मुले तर्कशुद्ध विचार करू लागतात; पण भावनांची पकड अजूनही घट्ट असते. त्यांना योग्य-अयोग्य कळतं; मात्र त्याच वेळी त्यांना प्रेम, समजून घेणं आणि स्वीकृती यांची तीव्र गरज असते. ईश्वरीचा प्रश्न हा अभ्यासाविरुद्ध नव्हता; तो भावनांच्या मान्यतेसाठी होता, हे कळालं होतं. आपण अनेकदा शिक्षणाचा अर्थ केवळ पुस्तकांपुरता मर्यादित ठेवतो. धडे, गुण, परीक्षा, गृहपाठ याच भोवती शिक्षण फिरतं! पण शिक्षणतत्त्वज्ञ जॉन ड्युई म्हणतात, ''Education is not preparation for life; education is life itself.'' शिक्षण म्हणजे जीवन जगण्याची कला. त्यात अनुभव आहेत, संवाद आहे, खेळ आहे, अपयश आहे, पुन्हा उभं राहणं आहे.ईश्वरीला आजींनी रागावलं त्यामागे प्रेमच होतं; पण ते प्रेम तिच्यापर्यंत कठोरतेच्या रूपात पोहोचलं. बालमानसशास्त्र सांगतं की सततची ओरड मुलांच्या आत्मविश्वासावर परिणाम करते. मुलं गप्प होतात, प्रश्न विचारणं कमी करतात किंवा कधी बंडखोर होतात. उलट समजून घेतलेली शिस्त त्यांना जबाबदार बनवते. मानसशास्त्रज्ञ डॅनिअल गोलमन यांनी 'भावनिक बुद्धिमत्ता' ही संकल्पना मांडली. भावनिक जाणीव आणि भावनांचं व्यवस्थापन शिकलेलं मूल आयुष्यात अधिक सक्षम ठरतं. त्या दिवशी ईश्वरीचा प्रश्न ऐकून घेतला गेला, तिच्याशी शांतपणे संवाद साधला गेला हा तिच्या भावनिक विकासाचा महत्त्वाचा क्षण होता. तिने स्वतःच्या भावनांसोबत आजीलाही समजून घेऊन सकारात्मक प्रतिसाद दिला होता.

लेख ऐकण्यासाठी स्कॅन करा

तिला समजावून देतांना सांगितलं, ''अभ्यास महत्त्वाचा आहे कारण तो आपल्याला ज्ञान देतो; पण खेळही महत्त्वाचा आहे कारण तो आनंद देतो. वेळेचं नियोजन केलं तर दोन्ही शक्य आहे.''

वर्गातील इतर मुलंही या चर्चेत सामील झाली. कुणी म्हणालं, ''माझी आईही आधी अभ्यास म्हणते.'' कुणी म्हणालं, ''मी आधी गृहपाठ करून मग खेळतो.'' त्या दिवशी धड्यापेक्षा मोठा धडा शिकला गेला संवादाचा.

शाळा हे ठिकाण केवळ फळा, खडू आणि पुस्तकं इतक्यानेच भरलेले नसते. शाळा मन मोकळं करण्याची जागा असायला हवी. घरात न बोलता आलेले प्रश्न, इथे शब्द शोधता येतात पोरांना. शिक्षक हा केवळ विषय शिकवणारा नसतो; तो भावनांचा दुवा असतो घर आणि मुलांच्या मनामधला.

ईश्वरीचा ''पुस्तकच समदं राहतं का?'' हा प्रश्न मनात घुमतो. तो प्रत्येक पालक, शिक्षक आणि समाजाला विचारतो, आपण मुलांच्या अभ्यासाला महत्त्व देतो; पण त्यांच्या भावनांनाही तेवढंच स्थान देतो का? हा प्रश्न येतोच. या संवादामुळे ईश्वरीसह सर्व वर्गातील मुलांना चर्चेत सहभागी होता आले. तिला तिच्या प्रश्नाचं उत्तर मिळालं होतं याचं समाधान तिच्या चेहऱ्यावर दिसत होतं.


मुलांना शाळा म्हणूनच आवडते मनापासून कारण इथे त्यांना समजून घेतलं जातं. इथे प्रश्न विचारायला मोकळीक असते. इथे मुलांचं हसू जपलं जातं. इथे पुस्तकाबरोबर मनही वाचलं जातं. पुस्तक ज्ञान देतं; पण समजून घेणं, आत्मविश्वास देतं आणि आत्मविश्वासानेच खरं शिक्षण फुलतं! ■■



मयूर बागुल
राज्य पुरस्कार प्राप्त लेखक
९०९६२१०६६९

लघुकथा

# बेरोजगार तरुणांचे नैराश्य




राहुलच्या खोलीत आजही सकाळ उगवली होती पण त्याच्या आयुष्यातील रात्र अजूनही संपलेली नव्हती. खिडकीतून आत येणारा प्रकाश त्याच्या चेहऱ्यावर पडत होता पण त्याच्या डोळ्यात काहीच हालचाल नव्हती. छताकडे एकटक पाहत तो पडून होता. मोबाईलचा अलार्म बऱ्याच वेळापूर्वी वाजून गेला होता. उठण्याचे कारण उरले नव्हते. ऑफिसला जायचे नव्हते, कॉलेजला जायचे नव्हते आणि कुठेच जायचे नव्हते. चार वर्षांपूर्वी तो हाच राहुल नव्हता. इंजिनिअरिंगचा निकाल लागल्याच्या दिवशी त्याच्या डोळ्यांत स्वप्नांची चमक होती. आईने गोड शिरा केला होता. वडील शेजाऱ्यांना सांगत होते, ''माझा मुलगा इंजिनिअर झाला.'' त्या दिवशी घरात एक वेगळाच उत्साह होता.

राहुललाही वाटत होतं. आता आयुष्याची गाडी वेगाने धावणार! पण ती गाडी स्टेशनवरच थांबली. पहिली मुलाखत त्याने खूप आत्मविश्वासाने दिली होती. नवा शर्ट, नीट इस्त्री केलेली पँट, हातात फाईल आणि चेहऱ्यावर आशा! पण निकाल लागला We regret to inform you पहिल्यांदा त्याने ते सहज घेतले. चालायचंच! तो स्वतःलाच म्हणाला. दुसरी, तिसरी, चौथी मुलाखत हळूहळू नकारांची सवय झाली पण प्रत्येक नकाराने आतून काहीतरी तुटत होतं. सुरुवातीला मित्र फोन करत होते. ''काय रे, काही लागलं का?''

''नाही रे, अजून प्रयत्न चालू आहेत.''

नंतर फोन कमी झाले. मग बंद झाले. व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपमध्ये मित्रांचे फोटो येत होते. कोणाला नोकरी लागली, कोणाचा ऑनसाईट कॉल आला, कोणाची बढती झाली. राहुल फक्त बघत राहायचा. त्याला आठवत होतं ह्याच लोकांसोबत तो रात्री उशिरापर्यंत बसून भविष्यासंबंधी बोलायचा. आपण सगळे मोठे होणार! पण आता तो एकटाच लहान होत चालला होता. आई रोज विचारायची, ''आज काही अर्ज केला का?'' तो मान हलवायचा. कधी कधी खोटं बोलायचा. ''हो केला!''

खरं म्हणजे त्याच्यात अर्ज करण्याचीही ताकद उरली नव्हती. एक दिवस वडिलांनी शांतपणे विचारलं, ''तू काही दुसरं काम बघ ना! काही तरी तरी कर.'' त्या वाक्यात काळजी होती पण राहुलला अपमान वाटला. त्याला वाटलं मी इतका कमी आहे का? त्या रात्री तो बराच वेळ छताकडे पाहत पडून होता. नैराश्य हळूहळू त्याच्या आयुष्यात शिरलं. सुरुवातीला ते एक विचार होतं, कदाचित मी पुरेसा चांगला नाही. नंतर ते एक भावना बनलं, मी काहीच नाही. मग ती त्याची ओळख झाली. तो मित्रांच्या भेटी टाळू लागला. नातेवाईकांच्या कार्यक्रमांना जाणं बंद केलं. घरातल्या संभाषणातही तो कमी बोलू लागला. त्याच्या खोलीत एक वेगळंच शांत वातावरण तयार झालं होतं! जणू काही आवाजालाही आत येण्याची भीती वाटत होती. त्याच्या आईला जाणवत होतं. ती कधी त्याच्या आवडीचा चहा करून आणायची. कधी विचारायची, ''तुला काही त्रास होतोय का?'' तो फक्त म्हणायचा, ''नाही!'' पण त्रास होत होता.

रोज सकाळी उठताना त्याला स्वतःशीच लढावं लागत होतं. 'आज उठावं का?' कधी कधी त्याला वाटायचं जर सगळं थांबलं तर? जर ह्या विचारांचा आवाज बंद झाला तर? पण मग आईचा चेहरा आठवायचा. ती दारातून डोकावून बघत असे तो ठीक आहे का ते पाहण्यासाठी. एक दिवस दुपारी त्याचा जुना मित्र समीर अचानक घरी आला. राहुलला त्याला भेटायची इच्छा नव्हती पण आईने हाक मारली. समीर समोर बसला. काही वेळ दोघेही शांत होते. मग समीर म्हणाला, ''मला माहीत आहे. तू काय अनुभवतोयस.'' राहुलने वर पाहिलं. समीर हसत नव्हता. तोही गंभीर होता. ''माझ्याबरोबरही असंच झालं होतं,'' तो म्हणाला. ''दोन वर्ष काहीच लागलं नाही. मला वाटायचं मी संपलो.'' राहुल काही बोलला नाही. समीर पुढे म्हणाला, ''पण मग मला समजलं बेरोजगारी म्हणजे अपयश नाही. ती एक अवस्था आहे.'' त्या दिवशी राहुलने बराच वेळानंतर कोणाशी मन मोकळं केलं. त्याने पहिल्यांदा कबूल केलं मला भीती वाटते. कशाची? की आयुष्य असंच राहील. समीर शांतपणे म्हणाला, ''नाही राहणार!'' तो उठताना म्हणाला ''उद्या बाहेर जाऊया. काही कामासाठी नाही. फक्त चालायला.''

दुसऱ्या दिवशी राहुल गेला. रस्त्यावरची माणसं, गाड्या, आवाज सगळं काही त्याला खूप दिवसांनी जाणवलं. जग चालू होतं. फक्त तोच थांबला होता. त्या दिवसापासून काही मोठा बदल झाला नाही. त्याला लगेच नोकरी लागली नाही; पण एक छोटा बदल झाला. तो पुन्हा अर्ज करू लागला. आईशी थोडं बोलू लागला. कधी कधी स्वतःवर विश्वास ठेवण्याचा प्रयत्न करू लागला. नैराश्य पूर्णपणे गेलं नव्हतं. ते अजूनही त्याच्या सावलीसारखं सोबत होतं पण आता त्याला माहीत होतं तो एकटा नाही! आणि कदाचित ही रात्र कायमची नाही! कारण कुठेतरी, हळूहळू त्याच्या आयुष्यात पुन्हा एकदा सकाळ उगवत होती.

# जगण्याची असीम उर्मी



रमा जाधव
कोल्हापूर
८००७९९७२२३

या गीतात अवखळ रस आहे. राजस, धीरगंभीर नाही; तर उन्मुक्त, थोडासा वेडावलेला, थोडासा धडधडणारा श्वास आहे. 'आज फिर जीने की तमन्ना है' हे वाक्य जणू आत्म्याने स्वतःशी केलेलं गुपित बोलणं. कुणाला सांगायचं नाही पण स्वतःला आठवण करून देणं. कालच्या अंधारातून डोळे चोळत बाहेर पडलेली स्त्री आज पहिल्यांदाच उजेडाकडे चालते आहे. उजेड इथे फक्त प्रकाश नाही; तो स्वतःवरचा विश्वास आहे.

'काँटों से खींच के ये आँचल'मध्ये काटे फक्त बाहेरचे नाहीत. समाजाचे टोचरे शब्द, मनात साचलेली अपराधभावना, आपल्याच अंगावर चढलेले बंधनांचे धागे त्या सगळ्यांतून पदर ओढून काढणं म्हणजे स्वतःची सुटका करून घेणं. 'तोड़ के बंधन बांधे पायल' इथे फार सूक्ष्म उलथापालथ आहे. बंधन तोडून पायल बांधणं म्हणजे नव्या गुलामगिरीत शिरणं नाही; चालायला सुरुवात करणं आहे. पायातली पायल म्हणजे चालताना वाजणारी स्वतःची जाणीव. तिचा आवाज स्वतःलाच ऐकू यावा म्हणून. कोणी रोखू नये अशी 'दिल की उड़ान' ही बंडखोर उड्डाण नाही; ती सावध उंची आहे.

उडायचंय पण आकाशाशी भांडून नाही. उडताना हसणं येतंय, थोडंसं घाबरणंही आहे. त्या हसण्यामागे जुन्या जखमांची आठवण आहे; त्या घाबरण्यामागे नव्या वाटेचा अंदाज. म्हणूनच 'आज फिर मरने का इरादा है' हा मृत्युचा विचार नाही; जुन्या स्वतःला मागे टाकण्याचा निर्धार आहे. आतली कालची मी आज मरावी आणि आजची मी उद्या जन्म घ्यावा, एवढाच त्या ओळीचा अर्थ.

'कल के अंधेरों से निकल के' ही बाहेर पडणारी व्यक्ती एखाद्या चमत्कारामुळे उजेडात आलेली नाही. तिने डोळे चोळले आहेत. म्हणजेच, तिने वास्तव पाहायचं धाडस केलं आहे. 'फूल ही फूल ज़िंदगी बहार है' ही घोषणा भोळी वाटते पण तिच्यामागे अनुभवाची थरथर आहे. फुलं दिसतात कारण काट्यांची आठवण अजून ताजी आहे. बहार उमलते कारण हिवाळा अंगावरून गेला आहे.

'मैं हूँ खुमार या तूफ़ां हूँ' या प्रश्नात स्वतःची ओळख अजून ठरलेली नाही. नशेत आहे का मी, की वादळ आहे? दोन्हींचं मिश्रणच कदाचित माणूस असतो. म्हणूनच 'डर है सफ़र में कहीं खो न जाऊँ मैं' हे भीतीचं कबूलनामं येतं पण तरीही 'रस्ता नया' स्वीकारला जातो. रस्ता नवा आहे, म्हणून हरवण्याची शक्यता आहे आणि हरवण्याची शक्यता आहे, म्हणून चालण्याला अर्थ आहे.

सचिन देव बर्मन यांच्या सुरांतून हे शब्द नदीसारखे वाहतात. पाणी शांत आहे पण आत खोलवर प्रवाह आहे. लतादीदींच्या आवाजात या प्रवाहाला काठ मिळतो. तिचा सूर कुठेही आरडाओरड करत नाही; तो मनात घर करतो, खुर्ची ओढून बसतो आणि हळूच म्हणतो, 'आज पुन्हा जिवंत राहायचं आहे.' शैलेन्द्र यांच्या शब्दांतला शाही रस असा आहे की तो राजदरबारात मिरवत नाही; तो साध्या घरात, साध्या माणसाच्या मनात, मुकाटपणे मुक्काम करतो.

हे गीत ऐकताना आपल्याला मोठं धैर्य मिळत नाही; आपल्याला रोजचं धैर्य मिळतं. उठायचं, चालायचं, पडायचं, पुन्हा उठायचं. मोठी क्रांती नाही; लहानशी पण प्रामाणिक पुनर्जन्माची चाहूल.

# नदीत कचरा टाकण्याविरोधात विद्यार्थ्यांचा एल्गार

## लोणी-काळभोर ग्रामपंचायतीचा निर्णय रखडला; लोकवस्तीत पाच दिवसांपासून कचऱ्याचे ढीग




**लोणी काळभोर (वार्ताहर) :** पुणे शहराची जीवनवाहिनी असलेल्या मुळा-मुठा नदीपात्रात गेल्या अनेक वर्षांपासून लोणी-काळभोर, कदम वाकवस्ती ग्रामपंचायती तसेच परिसरातील काही गावांकडून बेकायदेशीरपणे दररोज कचरा टाकला जात असल्याच्या निषेधार्थ एमआयटी शिक्षण संकुलातील विद्यार्थ्यांचे 'कचरा बंद' आंदोलन सुरूच आहे. परिणामी दोन्ही ग्रामपंचायतींच्या हद्दीतील लोकवस्तीत गेल्या पाच दिवसांपासून कचरा न उचलल्याने अक्षरशः कचऱ्याचे ढीग साचले आहेत.

पर्यावरण व सार्वजनिक आरोग्यास गंभीर धोका निर्माण करणाऱ्या या प्रकाराविरोधात विद्यार्थ्यांनी प्रथम दि. ४ मार्च २०२६ रोजी विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारावर 'कचरा बंद' आंदोलन करत कचरा वाहून नेणाऱ्या ग्रामपंचायतींच्या ट्रॅक्टरांना कॅम्पसमधून नदीपात्राकडे जाण्यास मज्जाव केला होता. त्यानंतर पोलीस उपायुक्तांच्या मध्यस्थीनंतर विद्यार्थ्यांनी संबंधित ग्रामपंचायतींना कचरा प्रश्न निकाली काढण्यासाठी सात दिवसांची मुदत दिली होती. मात्र मुदत संपूनही नदीपात्रात कचरा टाकणे सुरूच राहिल्याने विद्यार्थ्यांनी पुन्हा १३ मार्च २०२६ रोजी आंदोलन छेडत नदीपात्राकडे जाणाऱ्या कचऱ्याच्या गाड्यांना विद्यापीठाच्या प्रवेशद्वारावर अडविले. आंदोलन सुरू होऊन पाच दिवस उलटूनही कोणताही तोडगा न निघाल्याने विद्यार्थ्यांचे आंदोलन अद्याप कायम आहे.

दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी नदीपात्रात साठलेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यांना भीषण आग लागली होती. सलग चार दिवस ही आग धुमसत राहिल्याने परिसरात प्रचंड विषारी धूर पसरला. यामुळे एमआयटी शैक्षणिक संकुलातील ६ ते ७ विद्यार्थ्यांना श्वसनाचा त्रास व गुदमरल्याची लक्षणे जाणवल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करावे लागले. या घटनेनंतर विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संताप व असुरक्षिततेची भावना निर्माण झाली. यानंतर हवेलीचे उपविभागीय अधिकारी यशवंत माने, लोणी-काळभोरचे अप्पर तहसीलदार तृप्ती कोलते तसेच दोन्ही ग्रामपंचायतींचे माजी सरपंच व ग्रामसेवक यांनी नदीत थेट टाकल्या जाणाऱ्या कचऱ्याच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट दिली मात्र या गंभीर प्रश्नावर अद्यापही ठोस तोडगा निघालेला नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पुणे कार्यालयानेही पुणे जिल्हा परिषद तसेच दोन्ही ग्रामपंचायतींना नोटीस जारी केली आहे. नदीपात्रात कचरा टाकणे अत्यंत गंभीर बाब असून तो तातडीने थांबवून सदर प्रकरणी येत्या सात दिवसांत स्पष्टीकरण सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यासह, उपअधीक्षक भूमिलेख, हवेली यांनी ११ मार्च २०२६ रोजी सद्यस्थितीत कचरा टाकल्या जाणाऱ्या जागेची मोजणी केली. त्यानंतर १६ मार्च २०२६ रोजी परिपत्रक काढत गट क्रमांक ११३ ही जागा मुळा-मुठा नदीपात्रातच असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे आता दोन्ही ग्रामपंचायतींना कचरा व्यवस्थापनासाठी तातडीने पर्यायी व्यवस्था करावी लागणार आहे.

### कदमवाकवस्तीचा ग्रामसभेत ठराव

विद्यार्थ्यांच्या आंदोलनानंतर कदमवाकवस्ती ग्रामपंचायतीने सामंजस्याची भूमिका घेत बुधवारी झालेल्या ग्रामसभेत कचरा व्यवस्थापनासाठी पर्यायी जागेची मागणी प्रशासनाकडे करण्याचा ठराव मंजूर केला. तसेच पर्यायी जागा उपलब्ध होईपर्यंत त्यांच्या हद्दीतील कचरा हडपसर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाकडे पाठविण्याचा निर्णयही सर्वानुमते घेण्यात आला. याउलट लोणी-काळभोर ग्रामपंचायतीची मंगळवार, दि. १७ मार्च २०२६ रोजीची ग्रामसभा गावकऱ्यांच्या अपुऱ्या उपस्थितीमुळे कोणताही ठराव न घेता तहकूब करण्यात आली.

### गट क्रमांक ११३ नदीपात्रातच; पर्यायी व्यवस्था करावीच लागणार

विद्यार्थ्यांच्या आंदोलनानंतर हवेली पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शेखर शेलार यांनी लोणी-काळभोर व कदमवाकवस्ती ग्रामपंचायतींना नोटीस बजावत शास्त्रोक्त पद्धतीने कचरा व्यवस्थापन, वर्गीकरण व विल्हेवाट लावण्याच्या सूचना दिल्या असून मुळा-मुठा नदीपात्रात कचरा टाकण्यास त्वरित बंदी घालत तातडीने पर्यायी जागेची व्यवस्था करावी, असे निर्देश दिले आहेत.

> नदीपात्रात कचरा टाकणे अत्यंत चुकीची गोष्ट आहे. या गंभीर प्रश्नावर कदमवाकवस्ती ग्रामपंचायतीने ग्रामसभेत सर्वानुमते घेतलेले ठराव अत्यंत स्तुत्य आहेत, याबद्दल त्यांचे आभार! लोणी-काळभोर ग्रामपंचायतदेखील या प्रश्नी लवकरच सामंजस्याची भूमिका घेऊन ग्रामसभा आयोजित करून पर्यायी व्यवस्था करेल, अशी आम्हाला अपेक्षा आहे.
>
> **– डॉ. महेश चोपडे,** कुलसचिव, एमआयटी एडीटी विद्यापीठ, लोणी-काळभोर, पुणे

# ध्यास, रंगकर्मी सन्मान सोहळा



**मुंबई :** मराठी संस्कृती आणि भाषेचा गौरव करणारा विनोद आणि महेंद्र पवार यांच्या 'अॅड फिझ' निर्मित 'चैत्र चाहूल' हा कलेचा, संस्कृतीचा आणि सामाजिक बांधिलकी जपणारा मानाचा कार्यक्रम यंदाही अत्यंत दिमाखात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात अभिनेता वैभव मांगले यांच्या प्रभावी कथावाचनाने झाली. त्यांनी प्रख्यात लेखक विद्याधर पुंडलिक यांच्या 'माळ' या गाजलेल्या कथेचे वाचन सादर केले. मानवी नातेसंबंध, एकटेपणा आणि भावनिक पोकळी यांचे सूक्ष्म दर्शन घडवणाऱ्या या कथेचे त्यांनी केलेले सादरीकरण इतके जिवंत होते की, सभागृहातील रसिक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले. उपस्थितांनी या वाचनाला उत्स्फूर्त दाद दिली.यानंतर 'ध्यास' आणि 'रंगकर्मी' सन्मानांचे वितरण करण्यात आले. पुण्यातील 'सुदर्शन रंगमंच'च्या शुभांगी दामले यांना 'ध्यास सन्मान' प्रदान करण्यात आला तर प्रख्यात लेखक व भाष्यकार सुरेश गोसावी यांना 'रंगकर्मी सन्मान' देऊन गौरविण्यात आले. या प्रसंगी नीलेश जाधव यांनी पद्मश्री डॉ. अश्विनी भिडे-देशपांडे यांना स्वतः तयार केलेल्या विठोबाच्या तैल चित्राची आकर्षक फोटोफ्रेम भेट दिली. तसेच त्यांना सापडलेल्या सोन्याच्या दागिन्यांतून मिळालेली रक्कम सामाजिक कार्यासाठी देण्याचा उदात्त निर्णय घेत पेण येथील दिव्यांग मुलांसाठी कार्यरत 'सुहित जीवन ट्रस्ट'च्या संचालिका सुरेख पाटील यांच्याकडे ती रक्कम सुपूर्द करण्यात आली. उत्तरार्धात पद्मश्री डॉ. अश्विनी भिडे-देशपांडे यांनी 'रंग विठ्ठल' हा खास 'चैत्र चाहूल'साठी सादर केलेला अभंग रसिकांसमोर सादर केला. त्यांच्या सुरेल गायनाला तबल्यावर यती भागवत, संवादिनीवर ज्ञानेश्वर सोनवणे, तालवाद्यावर सूर्यकांत सुर्वे, पखवाजवर हनुमंत रावडे, बासरीवर अमर ओक तसेच स्वरसाथीसाठी निमिष कैकाडी, स्वरांगी मराठे आणि स्वराली जोशी यांनी समर्थ साथ दिली.

# एकी हेच बळ? गावात झालेत कचऱ्याचे तळ

**लोणी काळभोर (सचिन सुंबे) :** लोणी काळभोर व कदमवाकवस्ती येथील टाकल्या जाणाऱ्या मुळा-मुठा नदीपात्रातील कचऱ्याच्या ढिगाऱ्यांना २६ फेब्रुवारी २०२६ रोजी भीषण आग लागली होती. या आगीमुळे चार ते पाच किलोमीटरचा परिसर धुराने व्यापला होता. आग तब्बल चार दिवस धुमसत राहिली होती. त्यामुळे परिसरात धूर पसरला होता. या धुरामुळे एमआयटी एडीटीमधील विद्यार्थ्यांना श्वास घेण्यास त्रास झाला होता. या घटनेनंतर विद्यार्थी, कर्मचारी व परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला. त्यामुळे विद्यार्थ्यांनी पुढाकार घेत नदीपात्रात थेट कचरा टाकणे बंद करण्यासाठी कचरा बंद आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनामध्ये लोणी काळभोर व कदमवाकवस्ती येथील कचऱ्याच्या गाड्या एमआयटीमधुन सोडण्यास बंदी घातली आहे आणि इथेच सुरु झाली पूर्व हवेलीतील कचऱ्याची धगधग. कचरा बंद आंदोलनामुळे लोणी काळभोर आणि कदमवाकवस्ती या गावात जागोजागी कचऱ्याचे ढीग दिसून येत आहेत.

या पार्श्वभूमीवर लोणी काळभोर ग्रामपंचायतीत चर्चा करण्यासाठी ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती मात्र कमी उपस्थितीमुळे सभा तहकूब करण्यात आली. त्यासंदर्भात एमआयटी शिक्षण संस्थेला कायदेशीर भाषेत उत्तर देऊ, असा खणखणीत इशारा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत काळभोर यांनी दिला आहे. यावेळी बोलताना प्रशांत काळभोर म्हणाले, एम आयटी संस्थेने विद्यार्थ्यांचा वापर करून आंदोलन घडवून आणले. गावकऱ्यांनी विरोध केला असता तर विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल झाले असते, म्हणून



आम्ही संयम बाळगला. मात्र आमच्या संयमाला कमजोरी समजू नये. तसेच त्यांनी आरोप केला की, एमआयटीकडे स्वतःचा कचरा प्रक्रिया प्रकल्प नाही आणि त्यांचा कचरा नदीपात्रात टाकला जातो. गट क्रमांक ३९ मधील रस्ता गायब करण्यात आल्याचा व ओढ्यावर अतिक्रमण झाल्याचाही आरोप त्यांनी केला.

दरम्यान या विषयावर आयोजित करण्यात आलेली ग्रामसभा गणपूर्तीअभावी तहकूब करण्यात आली.

'एकी हेच बळ? गावात झालेत कचऱ्याचे तळ' अशी अवस्था झाली आहे. जर ग्रामसभा बोलावली होती तर गण संख्येअभावी ती तहकूब करण्याची नामुष्की का आली? कारण गावात एकी नसल्याचे दिसून येत आहे. एरवी पालखी तळाला नाव देण्यासाठी व पालखीचा मान घेण्यासाठी पुढे येणारे पुढारी गावाच्या महत्त्वाच्या प्रश्नासाठी एकत्र येत नाहीत ही लाजीरवाणी गोष्ट आहे. प्रशांत काळभोर व त्यांचे सहकारी कचरा प्रकल्प आणण्यासाठी प्रयत्न करत आहेत. राजकारण जरूर करावे पण गावाचा एखादा मोठा प्रश्न पुढे आला की गावकी, भावकी व पुढारपण बाजूला ठेवून गावातील नागरिकांसाठी व नागरिकांच्या आरोग्यासाठी एकत्र येणे कधीपण फायद्याचेच आहे.

राजकारण करत असताना त्यात समाजकारण सुद्धा महत्त्वाचे आहे. विरोधासाठी विरोध न करता समाजासाठी एकीकरण हे महत्त्वाचे आहे. फक्त निवडणुकीसाठी राजकारण करुन इतर वेळी गावाच्या विकासासाठी एकत्रीकरण महत्त्वाचे आहे. एखादा मोठा प्रकल्प गावात होत असेल तर तो दुसऱ्या गटाने हाणून न पाडता तो पूर्ण होणे गरजेचे आहे. तुम्ही राजकारण करा, एकमेकांशी बोलू नका पण प्रकल्प हाणून पाडू नका, असे लोणी काळभोर व कदमवाकवस्ती येथील नागरिक बोलून दाखवीत आहेत.

एखाद्या गटाच्या पुढाऱ्याने चांगला प्रकल्प गावात आणला तर त्याचे श्रेय जरुर त्या पुढाऱ्याला मिळाले पाहिजे व गावाच्या सुधारणेसाठी विरोध

## गाव करील तो राव काय करणार?

गाव करील तो राव काय करणार? ही म राठीत म्हण आहे जी गावकऱ्यांच्या एकजूटीच्या सामूहिक शक्तिला अधोरेखित करते. 'गाव करील ते राव काय करील?' याचा अर्थ असा होतो की एका गटाने जे करू शकत नाही, ते संपूर्ण गाव एकत्र यऊन सहज साध्य करू शकते. सामूहिक एकतेचे बळ वैयक्तिक सामर्थ्यापेक्षा मोठे असते. त्यामुळे आपल्याच गावातील कचरा आपल्यालाच टाकण्यासाठी बंदी असावी अशी नामुष्की येणे खरोखरच लाजीरवाणी गोष्ट आहे. कचरा नदीत न टाकता प्रकल्प उभा करुन त्याची विल्हेवाट लावली जावी. त्यामुळे एमआयटीच्या विद्यार्थ्यांना याचा त्रास होणार नाही. याची दखल दोन्ही गावातील पुढारी व नागरिकांनी घेऊन 'एकी हेच बळ' दाखवावे अशी अपेक्षा दोन्ही गावातील नागरिकांनी व्यक्त केली.

होता कामा नये. दुसऱ्या गटाने दुसरा चांगला प्रकल्प आणावा. लोणी काळभोर व कदमवाकवस्ती येथील अनेक प्रकल्प गावातील राजकारणामुळे बंद आहेत. यात गावकऱ्यांचेच नुकसान होत असून पुढारी फक्त आम्ही प्रकल्प बंद पाडला म्हणून खूश आहेत. त्यामुळे पुढाऱ्यांच्या डोक्यातील विरोधाचा कचरा जोपर्यंत हटत नाही तोपर्यंत लोणी काळभोर व कदमवाकवस्ती येथील कचरा प्रकल्प मार्गी लागणार नाही, अशी नागरिकांमध्ये चर्चा आहे.

# कोंढवा येथील थ्री ज्वेल्स अपार्टमेंटमध्ये ४०० किलोवॅट सौर ऊर्जा प्रकल्पाचे उद्घाटन

**कोंढवा (प्रतिनिधी) :** पर्यावरण संरक्षण आणि ऊर्जा बचतीच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत कोंढवा येथील थ्री ज्वेल्स अपार्टमेंट या गृहनिर्माण संकुलात ४०० किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचे उद्घाटन गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर आम दार योगेश आण्णा टिळेक यांच्या हस्ते पार पडले. या प्रसंगी प्रभाग क्रमांक ४०च्या नगरसेविका श्रीम ती रंजना टिळेकर, अर्चना जगताप, वृषाली कामठे व पूजा कदम तसेच या भागातील तरुण कार्यकर्ते राहुलअप्पा टिळेकर, तुषार कदम, श्रीकांत कामठे, उमेश दांडेकर हे सर्व जण आवर्जून उपस्थित होते.

सुमारे १६०० सदनिका असलेल्या कोंढवा भागातील या सर्वात मोठ्या निवासी संकुलात उभारण्यात आलेला हा सौर ऊर्जा प्रकल्प कदाचित पुणे जिल्ह्यातील निवासी संकुलातला सर्वात मोठा प्रकल्प आहे आणि पर्यावरणपूरक ऊर्जा निर्मितीसाठी एक आदर्श उपक्रम आहे. या प्रकल्पामुळे अपार्टमेंटच्या सामायिक वीज वापराचा मोठा भाग सौर ऊर्जेतून भागवता येणार असून वीज खर्चात लक्षणीय बचत होणार आहे. तसेच



कार्बन उत्सर्जन कमी होऊन पर्यावरण संवर्धनालाही हातभार लागणार आहे.

या प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी सचिव पांडुरंग भोले यांनी प्रास्ताविक करताना या सोलर प्रकल्पाच्या प्रवासाबद्दल माहिती दिली. सोसायटीचे अध्यक्ष सूर्यकांत खुरसे यांनी सोलर प्रोजेक्ट राबवण्यामागील भूमिका मांडली व या कामी अपार्टमेंट्सच्या सर्व सभासदांच्या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त केले. या प्रकल्पासाठी अंदाजे २.२५ कोटी खर्च झाले. सरकारी धोरणाप्रमाणे साधारणपणे ६८ लाख रुपयांची सबसिडी अपेक्षित आहे तर होणाऱ्या वीज निर्मितीमुळे अंदाजे वार्षिक एक कोटी रुपयांची वीज बील बचत होईल. त्यांनी पुढे सांगितले की, भविष्यात ऊर्जा बचत, पाणी संवर्धन आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबवण्याचा असोसिएशनचा मानस आहे. या सौरऊर्जा प्रकल्पा मुळे रहिवाशांमध्ये हरित ऊर्जेबाबत जागरूकता वाढण्यासही मदत होणार आहे. एवढ्या मोठ्या क्षमतेचा सोलर प्रोजेक्ट आकाराला आणतानाची तांत्रिक आव्हाने, प्रत्यक्ष कामात आलेल्या अडचणी आणि सोलर कमिटीने त्यावर केलेली मात याबद्दल संजय मुळे यांनी सविस्तर तांत्रिक माहिती दिली. रुपेश शहा यांनी आलेल्या स्ट्रक्चरल आव्हानांबद्दल माहिती दिली. आमदार योगेश टिळेकर यांनी सौर ऊर्जेच्या वाढत्या महत्त्वावर प्रकाश टाकत अशा उपक्रमांमुळे शाश्वत विकासाला चालना मिळत असल्याचे सांगितले. सौर ऊर्जेच्या वापरासाठी प्रोत्साहन देण्याचे सध्याच्या भाजप सरकारचे धोरण असल्याचे त्यांनी सांगितले. टिळेकर नगरमधील थ्री ज्वेल्सच्या सभासदांनी हा उपक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल अपार्टमेंटचे सर्व पदाधिकारी, सोलर कमिटीचे सदस्य, तांत्रिक आणि स्ट्रक्चरल सल्लागार तसेच प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल नेचर लाईट कंपनीचे सर्व भागीदार, तंत्रज्ञ, कर्मचारी या सर्वांचे अभिनंदन केले. संस्थेचे उपाध्यक्ष प्रल्हाद दुधाळ यांनी उपस्थितांचे आभार मानले. कोंढवा परिसरातील मोठ्या गृहनिर्माण संकुलांपैकी एक असलेल्या थ्री ज्वेल्स अपार्टमेंटने सौर ऊर्जा वापराचा घेतलेला हा पुढाकार इतर सोसायट्यांसाठीही प्रेरणादायी ठरणार आहे.